## निसटून सांज गेली

असा गार वारा, नदिचा किनारा
खगांचा इशारा,   आकाशीच्या
तुझा हात हाती, नसे शब्द ओठी
मृगाचा शहारा, कानातुझ्या

नि:शब्द वन हे, सांगून गेले
मनीचे तुझ्या भाव सारे मला
कितीदा वदावे असे वाटले अन
कितीदा तुझा ओठ तू दाबला

अशी सांज हलकेच, निसटून गेली
कितीदा करू माझी मी वंचना
कसे शब्द ओठातले चूर झाले
कसे पांग फेडू तरी सांगना

**नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/